MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Oct. to Dec. 2018

# विद्यावार्ता®

International Multilingual Refereed Research Journal

Editor
Dr. Yogita Apoorva Hiray
Dr. Kiran Namdeo Pingale

27) "Learning, Teaching and Evaluation throughChoice-Based Credit System"
**Shaikh Samin Anis, Nashik** ||115

28) "Gender Discrimination in Margaret Atwood's Select Novels"
**Prof. Bharatchandra P. Shewale, Dist- Nashik** ||120

29) Innovative Ideas in Library and Information Services in Digital Era
**Mr. Pankaj K Shewle, Dist- Nashik (Maharashtra)** ||125

30) Innovations and Best Practices in Teaching, Learning and Evaluation
**Rohit Shankar Shinde, Dist. Nashik** ||130

31) Paradigm shift in Teaching,Learning and Evaluation Perspectives in ...
**Smt.Lawrencia Susan Jackson V. J., Nasik** ||134

32) Teaching and Evaluation in Post Graduate Classes at College Level
**Mr. K. N. Wagh, Nashik** ||137

33) Versatile and convenient assisted method for preparation of flavone ...
**Santosh S. Chobe, Nashik (MS) India** ||141

34) Doping in Sports and Its Side Effects
**Suhas Shamrao Varade, Nashik** ||144

35) Critical Analysis of Amitav Ghosh's The Hungry Tide: A Subaltern Perspective
**Dr. Sandeep Ashok Wagh, Nashik (MS)** ||146

36) Interpreting Symbolism: A Study Symbols in Interpreter of Maladies
**Mr. Niteen Vasant Dandekar, Erandol** ||150

37) Innovative Teaching Method in Vedânta philosophy (A Simple, scientific ...
**Rupali Raghunath Wadekar, Sangli, Maharashtra** ||154

38) नाटकाचा रूपबंध आणि मराठीतील समस्या प्रधान नाटकांची परंपरा
**प्रा. गजानन भामरे, जि. नाशिक** ||159

39) अन्न सुरक्षा व शेतकरी समस्या एक अध्ययन
**प्रा. कविता के. भोये., सुरगाणा** ||161

40) आधुनिक शिक्षण पद्धतीतील सबाल्र्टन विचार प्रवाहाचे योगदान
**डॉ.प्रगती बी. मारकवार, नाशिक** ||165

http://www.printingarea.blogspot.com
www.vidyawarta.com/03

38

# नाटकाचा रूपबंध आणि मराठीतील समस्या प्रधान नाटकांची परंपरा

प्रा. गजानन भामरे
महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय,
मालेगांव, जि. नाशिक

***********

नाटक हा एक दृश्यश्राव्य साहित्य प्रकार आहे. अनेक नाट्यशास्त्रज्ञांनी आपआपल्यापरिने व्याख्या केल्या आहेत. नाटक हा एक कला प्रकार असून त्यातील महत्वाचा भाग म्हणजे दाखविण्याचा करार (दाखविणे) हा असतो. नाटकाला एक कथावस्तू (Plot) असते. ती घटना आणि प्रसंग यांनी (Situation and Incidents) गुंफलेली असते. असे लिखित नाटक रंगमंचावर नेपथ्यादिकांच्या सहाय्याने नटनटी प्रेक्षकांसमोर अभिनयित करतात, तेव्हा नाटक जन्माला येते. (१) असे प्रा. वसंत कानेटकर आपल्या नाटक एक चिंतन या ग्रंथात म्हणतात. नाटक ही सादरीकरणाची कला आहे. लेखक निर्मित संहिता असते. ही संहिता नट, दिग्दर्शक, संगीतकार, नेपथ्यकार सामूहिकरित्या सादर करतात.

मानवनिर्मित घटना, निसर्गनिर्मित घटना, संवाद नाट्य, विचार नाट्य, कथानकातील घटनाप्रसंग यातील अनपेक्षित कलाटणी, व्यक्तीव्यक्तीमधील संघर्ष इ. गोष्टी नाटकामध्ये हमखास संभवतात. नाटकाचे लेखन करणारा लेखक हा अदृश्य असतो. पात्रांच्या माध्यमातून रंगमंचावर कृती आणि उक्ती दिसतात. Make Belive हे नाटकाचे सूत्र असते. म्हणजे आभास निर्मिती केलेली असते. घडणारा प्रसंग आता आणि येथेच घडत आहे असे वाटते.

नाटक या संज्ञेचा मूळ अर्थ अभिनय करणे असा आहे. नट हा संस्कृत शब्द असून त्याचा अपभ्रंश होऊन नर्त (म्हणजे नाचणारा) हा शब्द प्राकृत भाषेत आला आहे. या अर्थाप्रमाणे विचार केल्यास नाटक या शब्दाचा अर्थ नाचणे असाच आहे. नट म्हणजे अभिनय करणारा, सोंग करणारा आणि नाटक म्हणजे नाट्यरुपाने, सोंगाच्या रुपाने दाखविणे किंवा सादर करणे असा अर्थ रुढ झाला. इंग्रजीतील ड्रामा हा शब्द मूळ ग्रीक ड्रॅन (Dran) या शब्दावरून आलेला असून त्याचा अर्थ कृती करणे असा आहे. नाटक म्हणजे प्रसंग आणि संवाद यांच्याद्वारा व्यक्त होणारा संघर्षमय काव्यात्मक अनुभव होय असे म्हणता येईल किंवा नाटक म्हणजे माणसाच्या अंतर्बाह्य क्रिया-प्रतिक्रियांचे दर्शन घडविणारा आकृतीबंध होय.(२) नाट्यात्मक संघर्ष हा पात्रांच्या कृती-उक्तींमधून प्रकट होत असतो. आणि तो दर्शनीयही असतो. पात्रांच्या मनातील भावकल्लोळ पात्रांच्या संवादांतून मुखर होतो.

नाट्य म्हणजे ताण निर्माण करणे. स्थिरता आणि गतिमानता या सूत्रांनी संहिता घडवलेली असते. नाट्यानुभावात ताणनिर्मितीची स्थिती महत्वाची असते. विचार, चिंतन, कृती, भाषा, स्थळकालसंबध्द वातावरण, अभिनय, नैसर्गिक घटना, व्यक्तिनिर्मित घटना, अचानकतेतून उद्‌भवलेली घटिते या सर्वांमधून ही ताणनिर्मिती साधली जाते. भरतमुनींनी नाट्यशास्त्राची उभारणी केली आहे.

नाट्यकृतीमध्ये नाट्यसंहिता असते अशी नाट्यसंहिता शब्दांनी बनलेली असते. आणि त्यातूनच नाट्यप्रयोग केला जातो. संहितेचा विचार केल्यास नाटकाचे बीज, कथानक, पात्रे, संवाद व भाषा हे प्रमुख घटक मानले जातात. प्रमुख नाट्यसंहितेबरोबर दोन प्रकारच्या नाट्यसंहिता समाविष्ट झालेल्या असतात. त्यातील एक म्हणजे भाषिक चिन्हांची आणि दुसरी रंगमंचावरील सूचनांनी दाखविलेली अभाषिक चिन्हांची संहिता असते.

नाटक ही सादरीकरणाची कला आहे. म्हणून अभिनय हा नाट्यकलेचा महत्वाचा पैलू आहे. तेव्हा नटाने आपल्या भूमिकेशी एकरूप होणे आवश्यक असते. कारण नाटकामध्ये मानवी मनाचे अनेक पदर एकवटलेले असतात. म्हणून नाटकातील व्यक्तिरेखा महत्वाच्या असतात. घटना स्वत: निर्माण होत नाहीत तर नाटककार लेखनातून निर्माण करीत असतो. व्यक्तीच्या मनातील परस्परविरोधी प्रवृत्तीतून घटना व प्रसंग निर्माण होतात. व्यक्ती मात्र प्रसंग निर्मितीच्या स्त्रोत असतात. नाटककार कृती उक्तींच्याद्वारे या व्यक्ती उभ्या करीत असतो. कधी व्यक्तीव्यक्तीत तर कधी व्यक्ती समूहाच्या माध्यमातून त्यांच्या अंतर्बाह्य घटनांचा कार्यकारण संबंध निर्माण करतो.

**समस्याप्रधान नाटकांची परंपरा :-**

इ.स. १८१८ मध्ये पेशवाई नष्ट होऊन महाराष्ट्रात इंग्रजी राजवटीला सुरूवात झाली. राज्यकर्ता बदलला की, राज्यकारभाराच्या दिशा बदलतात. या न्यायाने इंग्रजांच्या आचार-विचार, संस्कृती, भाषा या सर्वांचा मराठी माणसावर परिणाम झालेला दिसतो. महाराष्ट्रातील अनिष्ठ रूढी, परंपरा, स्त्री कडे बघण्याच्या दृष्टीकोणात सामाजिक स्थिती बदलत गेली. सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी अनेक मंडळी पुढे आली. त्यात स्त्री शिक्षण, प्रौढविवाह, जरठबालविवाहाचा निषेध, पुनर्विवाह, कन्याविक्रय निषेध इ. सामाजिक सुधारणांचा उल्लेख करता येतो.

समाजसुधारणांचा ध्यास असणाऱ्या समाज सेवकांबरोबरच सामाजिक समस्या या नाटकाचा विषय बनू लागल्या होत्या. स्त्री शिक्षणासाठी महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी समाज जागृती करून मुलींसाठी शिक्षण देण्यास सुरूवात केली. स्त्री शिक्षणाचा प्रश्न चर्चिला जात असताना सुशिक्षित स्त्री हे नाटक १८८६ मध्ये वासुदेव मोरेश्वर पोतदार यांनी व तरूणीशिक्षण नाटिका हे ना. बा. कानीटकर यांनी याच वर्षी लिहीलेले नाटक प्रसिध्द झाले. या नाटकातून स्त्री शिक्षणात कोणत्या प्रकारचे दोष राहिले आहेत. त्यासंबंधीची चर्चा व स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करण्यात आला आहे. तरूणीशिक्षण नाटिकेत स्त्री शिक्षणाची आवश्यकता सांगितली असली तरी स्त्री शिक्षणापासून होणारे दुष्परिणाम ठळकपणे दाखविले आहेत.

विधवा पुनर्विवाह या समस्येच्या बाबतीत प्रबोधविद्युत किंवा स्वैरसकेशा हे नाटक १८७१ मध्ये रघुनाथ अभ्यंकर यांनी लिहील आहे. महादेव बाळकृष्ण चितळे यांचे मनोरमा (१८७१), कार्लेकर - जोगळेकर यांनी लिहिलेले वैदिकी हिसधर्मतत्व प्रहसन (१८८३) रामकृष्ण भटांनी लिहिलेले रूढिदिग्विजय अर्थात् पुनर्विवाहपक्षाची सोळा आणे फजिती (१८८५), अण्णा मार्तंड जोशी यांचे संगीत सौभाग्यरमा, (१८९०), इंदिरा माधव हे रामचंद्र गोपाळ मिटबावकर यांचे नाटक (१८९५) अशी नाटके प्रसिध्द ाालेली दिसतात. सकेशा विधवा सावित्री हिच्या स्वैरवर्तनाची कहाणी प्रबोधविद्युत मध्ये तर वेश्येच्या प्रयत्नांना बळी न पडता विशुध्द राहणाऱ्या मनोरमेचे कथानक वैदिकीहिंसाधर्मतत्व यात पुनर्विवाह विषयक विचार प्रकट करण्यात आले आहेत.

जरठबाला विवाहाच्या प्रश्नांसबंधी लिहिल्या गेलेल्या नाटकात गोविंद बल्लाळ देवल यांच्या शारदा (१८९९) या नाटकाचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. त्याचबरोबर पुरूषोत्तम डोंगरे यांनी जरठोद्वाह (१८९०), शिंगणे-आचार्य यांनी कन्याविक्रय दुष्परिणाम (१८९५) ही नाटके या प्रश्नांसंबंधी लिहिलेली दिसतात. मल्हारराव नावाच्या वृध्द सरदाराने म्हाळसा या आपल्यापेक्षा कितीतरी लहान असणाऱ्या मुलीशी विवाह केला असता तिचे मन एका तरूण पुरूषावर जडल्याने शेवटी तिला आत्महत्या करावी लागली असे कथानक जरठाद्वाह मध्ये आले आहे. तर कन्याविक्रय दुष्परिणाम मध्ये एका पित्याने पैसे घेऊन आपली मुलगी म्हाताऱ्यास विकल्यामुळे तिच्यावर आलेल्या संकटाचे चित्रण केले आहे.

या दोन्ही नाटकांपेक्षा शारदा हे देवळाचे नाटक वेगळे ठरले. पाऊनशे वयमान असणाऱ्या भुंजुगनाथ नावाच्या माणसाने आपल्या श्रीमंतीच्या जोरावर लग्न करण्याचे ठरविले व त्यासाठी कांचनभट हा धनलोभी आपली तेरा वर्षाची मुलगी त्याला देण्यास तयार होतो. परंतु शारदा, तिची आई आणि समाजसेवक असणारा कोंदड यांच्या प्रयत्नाने हा बेत फिसकटतो. लोकांनी शारदेचे लग्न भुजुंगनाथाशी झाले आहे असे खोटेच सांगितल्यामुळे शारदा आत्महत्या करण्यासाठी जाते. परंतु कोंदडाने तिला वाचवून शंकराचार्याच्या आज्ञेने तिच्याशी विवाह कसा केला. या संबंधी कथानक आले आहे.

गुप्त-मंजूष (१९०३) या नाटकाचा विषय स्त्री शिक्षण हा होता. पण स्त्री शिक्षणापेक्षा चमत्कतिपूर्ण व अद्भूत असे कथानक आले आहे. मतिविकार (१९०६) हे श्री. कृ. कोल्हटकर यांनी पुनर्विवाहाचे समर्थन करण्यासाठी लिहिलेले नाटक आहे. वधुपरिक्षा (१९१३-१४) या नाटकात बालविवाह विषमविवाह, जातिभेद यांचा विचार केला आहे. परंतु याचा मुख्य विषय अनुलोमविवाह हा आहे. परिवर्तन (१९२२) या नाटकात राजकिय व सामाजिक सुधारणांचा स्त्री व पुरूषांसंबंधी मुख्य भाग आला आहे. त्याच बरोबर जातिभेद, स्त्री शिक्षण, स्त्री स्वातंत्र्य, बाला-प्रौढविवाह, केशवपन, पुनर्विवाह, घटस्फोट असे अनेक विषय आले आहेत.

अशा पध्दतीने समाजातील अनेक अनिष्ट रूढी, परंपरा, समस्या या त्या, त्या काळामधील नाटकाच्या कथानकाच्या रूपाने मांडल्या गेल्या आहेत आणि मानवी मनातील संघर्ष, संग्राम, लढाई यांना नाटकाच्या माध्यमातून

समाजापूढे मांडण्याचा प्रयत्न झाला आहे.

नाटक हे केवळ रंजनाचे साधन नसून समस्या सोडवणूकीचे, जाणीव जागृतीचे माध्यम असल्याची जाणीव प्रारंभापासूनच मराठीतील नाटककरांनी जोपासलेली दिसते. विशिष्ट प्रश्न केंद्रवर्ती ठेवत नाटयनिर्मिती करणारी ही जाणीव आधुनिकतेचे लक्षण आहे. समाजातील दुर्व्यवहार समाजासमोर रंजकतेने दाखवून समाजमानस जागृत करण्यावर कितीतरी आधुनिक नाटककारांनी भर दिलेला आहे.

समस्याप्रधान नाटके ही समस्याही मांडतात आणि ती कलाकृती म्हणून नाटके ही असतात, हे येथे लक्षात घ्यावे लागते.

संदर्भ :-

१) संपादक पवार गो. मा., हातकणंगलेकर म. द., निवडक मराठी समीक्षा, साहित्य अकादमी १९९९, पृष्ठ १४.

२) तत्रैव पृष्ठ २८८.

❑❑❑

39

# अन्न सुरक्षा व शेतकरी समस्या एक अध्ययन

प्रा. कविता के. भोये.
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सुरगाणा

**********

**प्रस्तावना:**

शासन शेती उत्पादनाशी संबधीत असलेल्या वस्तू व सेवांच्या किंमती नियंत्रण मुक्त करत आहे, आणि फक्त शेतीलाच्या बाबतीतच वेगवेगळया प्रकारची नियंत्रणे का ? सरकारच्या अशा दुटप्पी धोरणामुळे शेती व्यवसाय तोटयाचा ठरत आहे. कुठलाही व्यक्ती सहसा तोटयात चालणारा व्यवसाय करीत नाही, तसेच शेतकरीही तोटयात चालणारी शेती सोडण्याच्या मार्गावर आहे. कुटुंबातील एखाद्याने जमेल तशी शेती करून कुटुंबापुरते अन्नधान्य पिकवाचे व इतरांनी इतर व्यवसायातून आर्थिक उत्पन्न मिळवायचे अशी प्रवृत्ती ग्रामीण भागात बळावत चालली आहे. शेतकरी शेती व्यवसायापासून दूर जावू पाहत आहे. ही अन्न सुरक्षिततेच्या दृष्टिकोणातून अतिशय गंभीर बाब आहे. भारत ही कृषिप्रधान अर्थव्यवस्था आहे. आज जगाच्या पोशिंदयांवरच अशि वेळ यावी हि चिंता जनक बाब आहे.

मनुष्याची जीवनशैली वेगाने बदल होत आहेत. बदलत्या जीवनशैलीबरोबर लोकांच्या जीवनावश्यक गरजा, वस्तू यांच्या आवडीनिवडीत ही बदल झाला आहे. सध्याच्या काळात आरोग्य, शिक्षण, प्रवास, विज, डिझेल, पेट्रोल यासारखे इंधन इ. बाबी तज्ज्ञांच्या व्याख्येत बसोत वा ना बसोत पण त्या सर्वसामान्यांसाठी जीवनावश्यक झाल्या आहेत. पण शासनाच्या आर्थिक धोरणामुळे या पैकी अनेक बाबींचे दर नियंत्रणमुक्त आहेत. आज जर बघीतले शेतीपुढे समस्यांचा व अडथळयांचा डोगर उभा आहे. राजकीय पक्ष काणताही